# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ 2722

दिनांक :- 28 AUG 2019

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अनुदानित विना अनुदानीत पदवी/पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था
औरंगाबाद विभाग

**विषयः**- अनुसुचित जमातीचे नसतांना अनुसुचित जमाती म्हणून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या उमेदवाराविरुध्द कारवाही करणेबाबत.

**संदर्भः** १) मा. पोलीस निरीक्षक महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, वरळी, मुंबई यांचे पत्र क्र. मराअजाजआ/मुं/विधी/प्र.क्र.११२-२०१९/२१०१, दि.२६-०६-२०१९

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१९/६५९ दि.१९/०८/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयी कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या कार्यालयास अर्जदार श्री सदानंद गावीत यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला राखीव कोटयातून अनुसुचित जाती/जमाती या प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची नावे, अर्जात नमुद केलेली जात व त्यांनी सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

त्यानुषंगाने आपल्या संस्थेत राखीव कोटयातून प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती/जमाती या प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची नावे, अर्जात नमुद केलेली जात व त्यांनी सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रती तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात याव्यात. जेणेकरुन सदर माहिती महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांना सादर करणे सुलभ होईल.

सोबतः वरीलप्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग
प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) २४९४३८१९
e-mail add:-scstcomm@yahoo.com

जा.क्र.मराअजाजआ/मुं/विधी/प्र.क्र.११२-२०१९/ २१०१ दिनांक : २६/६/२०१९

प्रति,
मा. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१

विषय:- अनुसूचित जमातीचे नसतांना अनुसूचित जमाती म्हणून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या उमेदवाराविरुध्द कारवाई करणेबाबत.

सन २०१२.१३ ते २०१७.१८ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला अनु.जमाती (S.T) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवार विद्यार्थ्यांची यादी ,त्यांनी सादर केलेला जातीचा दाखला तसेच जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत याबाबत आपल्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन दिली जात नसल्याबाबत अर्जदार श्री.सदानंद गावीत यांनी आयोगाकडे तक्रार केली आहे.

अर्जदार यांच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्यामुळे सन २०१२.१३ ते २०१७.१८ या शैक्षणिक वर्षामध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राखीव कोटयातून प्रवेश घेतलेल्या अनु.जमाती/जाती विद्यार्थ्यांची नांवे , अर्जात नमूद केलेली जात व त्यांनी सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रती आयोगाच्या अवलोकनार्थ त्वरेने पाठविण्यांत याव्यात.

मा.सदस्य (विधी) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

पोलीस निरीक्षक
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
मुंबई.

F:\v ratna\विधी-सकपाळ\विधी-अहवाल मागविणे--1.docx112